NAAC Accredited-2015
'B'Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# व्यवस्थापन परिषदेच्या १३८ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
# सोमवार, दि. ३१ मे, २०२१ सकाळी ११:३० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १३८ वी बैठक सोमवार, दि. ३१ मे, २०२१ रोजी सकाळी ११:३० वा. Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सींगने मा.कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सींगने उपस्थित असलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. ल. कदम | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. र. भि. भोसले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| १०) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| ११) | ॲड. नी. सु. मंकणी | सदस्या |
| १२) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १३) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १४) | डॉ. श्रीमती सु. इ. शेख | सदस्या |
| १५) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १६) | डॉ. वि. ल. कदम - प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १७) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे - प्र.कुलसचिव | सदस्य-सचिव |

**स्वागत:**

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अभिवादन:**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९६ व्या जयंती निमित्त त्यांना सर्व सदस्यांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे व डॉ. कि. ल. बोंदर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. तसेच डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१

१. दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३५ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.
२. दि. १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३६ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.
३. दि. ०३ मार्च, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

कुलसचिव यांनी दि.२२ जानेवारी, २०२१ व दि.१५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेला कार्यवाही अहवाल व दि.०३ मार्च, २०२१ रोजी झालेल्या झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत व कार्यवाही अहवाल वाचून दाखविला असता, त्याअनुषंगाने सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१. दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३५ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.
२. दि. १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३६ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.
३. दि. ०३ मार्च, २०२१ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.२ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शासनास व शिखर संस्थाना पाठविण्यास, मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शासनास व शिखर संस्थाना पाठविण्यास, तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.३ IPR Policy, Consultancy Policy व Green Audit Policy बाबत मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : IPR Policy, Consultancy Policy व Green Audit Policy बाबत तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.४ शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आरोग्य विज्ञान संकुलासाठी एक (०१) तात्पुरते कंत्राटी सहायक प्राध्यापकाचे पद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तदानुषंगिक तरतूदीनुसार भरणे व कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा.कुलगुरु महोदयांनी १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता आरोग्य विज्ञान संकुलासाठी एक (०१) तात्पुरते कंत्राटी सहायक प्राध्यापकाचे पद महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या तदानुषंगिक तरतूदीनुसार भरणे व कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.५ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये गरीब, होतकरु आणि गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी धनादेश क्र. १३९०८८ नुसार रु.१,०१,०००/- देणगी स्विकारण्याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव व डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने तयार केलेली नियमावली विचारार्थ.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली तसेच डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने केलेली नियमावली स्विकारुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये गरीब, होतकरु आणि गरजू मुला-मुलींच्या शिक्षणासाठी डॉ. बी. वाय. यादव, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी यांनी धनादेश क्र. १३९०८८ नुसार रु.१,०१,०००/- देणगी स्विकारण्याबाबत तातडीची बाब म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
२. डॉ. बी. वाय. यादव पारितोषिक वितरणाबाबत समितीने तयार केलेली नियमावली खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
    - सदर नियमावलीमध्ये पारितोषिक ऐवजी शिष्यवृत्ती अशी दुरुस्ती करावी.
    - सदर शिष्यवृत्ती ही विद्यार्थी / विद्यार्थीनीस देण्यात यावी.

**विषय क्र.६ भौतिकशास्त्र (पदार्थविज्ञान) संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व १) वैश्विक इनोव्हेशन सोल्यूशन्स्, एलएलपी, सोलापूर, २) SuVi Instruments, सोलापूर, ३) ऑरगॅनिक सिडस् प्रोडक्शन अॅण्ड डिलर कंपनी, बोराळे यांच्यामधील सामंजस्य कराराचा मसुदा विचारार्थ.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व १) वैश्विक इनोव्हेशन सोल्यूशन्स्, एलएलपी, सोलापूर, २) SuVi, Instruments, सोलापूर, ३) ऑरगॅनिक सिडस् प्रोडक्शन अॅण्ड डिलर कंपनी, बोराळे यांच्यासमवेत Memorandum of Understanding (MOU) करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये कायदा अधिकारी यांनी सुचविलेली दुरुस्ती स्विकारुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **भौतिकशास्त्र (पदार्थविज्ञान) संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व १) वैश्विक इनोव्हेशन सोल्यूशन्स्, एलएलपी, सोलापूर, २) SuVi Instruments, सोलापूर, ३) ऑरगॅनिक सिडस् प्रोडक्शन अॅण्ड डिलर कंपनी, बोराळे यांच्यामधील सामंजस्य कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र.७ आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत M.A. Yoga हा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (यक) नुसार विद्या परिषदेने सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस केल्याची बाब विचारार्थ.

विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील कोणत्याही महाविद्यालयात व विद्यापीठ संकुलात योग विषयातील पदव्यूत्तर अभ्यासक्रम (M.A./M.Sc. Yoga) शिकविला जात नसल्यामुळे विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी जावे लागत असल्याने आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत M.A. Yoga हा २ वर्षाचा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यासाठी दि.२४/०३/२०२१ रोजीच्या विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : आरोग्य विज्ञान संकुलांतर्गत M.A. Yoga हा २ वर्षाचा नवीन अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ (यक) नुसार विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| प्रस्तावित अभ्यासक्रमाचे नाव | स्वरुप | कालावधी | प्रवेश क्षमता | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|---|
| **M.A. Yoga** | **4 Semesters with CBCS Pattern** | **2 Years** | **30** | **Any graduate degree from a recognized University** |

विषय क्र.८ **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर सर्व संकुलांमधील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभारासाठी स्थानिक निवड समितीमार्फत विद्यापीठ संकुलांतर्गत विविध विषयातील तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ (२) (च) नुसार, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशन करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार, व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. श्रीमती सु. इ. शेख यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

विषय क्र.९ शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) अ.क्र. ii ते vi मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी तीन वर्ष कालावधीकरिता "विशेष कक्ष स्थायी समिती" गठीत करुन सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र. १५८ (२.१) मधील तरतुदीनुसार विशेष कक्ष स्थायी समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| i | The Vice-Chancellor | Ex-Office-Chairman |
| ii | 2-3 Professors | Members |
| iii | 3-5 Principals | Members |
| iv | 1-2 Readers/Asso.Professors | Members |
| v | 1-2 Lecturers/Asstt.Professors | Members |
| vi | 2 women representative from teaching and non-teaching category | Members |
| vii | A representative of the State Govt. | Members |
| viii | The Deputy Registrar (Spl. Cell) | Member-Secretory |

शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) अ.क्र. ii ते vi मधील तरतुदीनुसार तीन वर्ष कालावधीकरिता "विशेष कक्ष स्थायी समिती" नामनिर्देशन करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) अ.क्र. ii ते vi मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी तीन वर्ष कालावधीकरिता "विशेष कक्ष स्थायी समिती" गठीत करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **ii** | **2-3 Professors** | १. डॉ. सुहास पुजारी<br>२. डॉ. सिद्राम सलवदे<br>३. डॉ. लक्ष्मीकांत दामा |
| **iii** | **3-5 Principals** | १. प्राचार्या डॉ. मीना गायकवाड<br>२. प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे<br>३. प्राचार्य डॉ. ए. बी. शिंगाडे<br>४. प्राचार्य डॉ. एन. बी. पवार<br>५. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर |
| **iv** | **1-2 Readers/Asso.Professors** | १. प्रा. देवेंद्र मदने<br>२. प्रा. तानाजी मगर |
| **v** | **1-2 Lecturers/Asstt.Professors** | १. डॉ. पी. जी. व्हनकडे<br>२. डॉ. श्रीमती अंजना लावंड |
| **vi** | **2 women representative from teaching and non-teaching category** | १. डॉ. श्रीमती जे. डी. माशाळे<br>२. श्रीमती एस. डी. नवगिरे |

**विषय क्र.१० हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर, वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी,सोलापूर व वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स,सोलापूर या तीन महाविद्यालयाना दहा वर्षाकरीता स्वायत्तता दर्जा देण्याबाबतची अधिसूचना/आदेश निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची शिफारस विचारार्थ.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२२ (१) मधील तरतुदीनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१२ मार्च, २०२१ रोजीचे पत्र.No.F.२२-१/२०१७ (AC) अन्वये खालील महाविद्यालयांना दहा वर्षाकरीता स्वायत्तता दर्जा प्रदान केला असून, याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने योग्य ती अधिसूचना/आदेश निर्गमित करण्याबाबत विद्यापीठास सूचित केले आहे.

| | |
|---|---|
| हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | शै. वर्ष २०२१-२०२२ ते २०३०-२०३१ |
| वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | शै. वर्ष २०२१-२०२२ ते २०३०-२०३१ |
| वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर | शै. वर्ष २०२०-२०२१ ते २०२९-२०३० |

उपरोक्त दि. १२ मार्च, २०२१ रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या पत्रान्वये कळविल्यानुसार, तीन ही महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२२ मधील तरतुदीनुसार, दि.२४/०३/२०२१ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ३२(१) अन्वये स्वायत्तता दर्जा देण्याबाबतची अधिसूचना/आदेश निर्गमित करण्यासाठी दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस सर्वानुमते शिफारस करण्यात आली.

त्यानुसार वरील तीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२२ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ ते २०३०-२०३१ या दहा वर्षाकरीता स्वायत्तता दर्जा देण्याबाबतची अधिसूचना/आदेश निर्गमित करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर, वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी,सोलापूर व वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या तीन महाविद्यालयांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२२(१) मधील तरतुदीनुसार व UGC ने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०३०-३१ या दहा वर्षाकरीता स्वायत्तता दर्जा देण्याबाबतची अधिसूचना/आदेश निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेने दुरुस्तीसह केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र.११ **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ अन्वये संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा तपासणी (शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापन) करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर कलम ११७ (१) (ग) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने १० तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करण्याची बाब फेरविचारार्थ.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ अन्वये संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा तपासणी (शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापन) करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर कलम ११७ (१) (ग) अन्वये दि.११/०२/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव क्रमांक २० अन्वये नामनिर्देशित ०४ तज्ज्ञ सदस्य (प्राचार्य डॉ. ए.बी. शिंगाडे, प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, प्रा. डॉ. व्ही.बी. पाटील व डॉ. बी. एन. आदटराव) यांचे नामनिर्देशन कायम ठेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.

ठराव : **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११७ अन्वये संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा तपासणी (शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापन) करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर कलम ११७ (१) (ग) अन्वये सर्वानुमते खालील सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्य डॉ. एम. टी. बचुटे | २. | प्राचार्य डॉ. एस. के. पाटील |
| ३. | डॉ. प्रशांत पवार | ४. | डॉ. एन. एन. लोंढे |
| ५. | डॉ. श्रीमती सुरैय्या शेख | ६. | डॉ. श्रीमती एम. जे. पाटील |

विषय क्र.१२ **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित तत्वावरील सोलापूर सोशल असोसिएशनचे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, सोलापूर व युनियन एज्युकेशन सोसायटीचे महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयांवर प्रशासक नेमण्याची समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**

सोलापूर सोशल असोसिएशनचे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, सोलापूर व युनियन एज्युकेशन सोसायटीचे महिला महाविद्यालय, सोलापूर हे महाविद्यालय संचलित संस्थेतील अंतर्गत वादामुळे व वारंवार संबंधित महाविद्यालयाच्या कामकाजाबाबत तक्रारी प्राप्त होत असल्याने, या दोन्ही महाविद्यालयाच्या कामकाजासंदर्भात चौकशी करण्यासाठी महाविद्यालयास प्रत्यक्षात भेट देऊन अहवाल सादर करण्यासाठी मा. कुलगुरु महोदया यांनी नियुक्त केलेल्या समितीने, दोन्ही महाविद्यालय संचलित संस्थेत अंतर्गत वाद असल्याने व महाविद्यालयाचे कामकाज सुरळीत होण्यासाठी प्रशासक नेमण्यासाठी केलेल्या शिफारशीवर चर्चे अंती, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित तत्वावरील सोलापूर सोशल असोसिएशनचे कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, सोलापूर व युनियन एज्युकेशन सोसायटीचे महिला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयांवर प्रशासक नेमण्यासाठी शासनास शिफारस करण्यापूर्वी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने सदर संस्थेस कारणे दाखवा नोटीस (Show Cause Notice) पाठवावी असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र.१३ विद्यापीठ कर्मचारी श्री. हिप्परगे रवींद्रनाथ यांना रु.१,८१,५००/- इतक्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देण्याची बाब विचारार्थ.**

विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती समितीने दि.१७/०३/२०२१ रोजी बैठक घेऊन विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजने अंतर्गत प्राप्त अर्जांपैकी श्री.रवींद्रनाथ हिप्परगे हे कर्करोगाने ग्रस्त असल्याने मानवतेच्या दृष्टीकोनातून विचारपूर्वक, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **विद्यापीठ कर्मचारी श्री. हिप्परगे रवींद्रनाथ यांना रु.१,८१,५००/- (अक्षरी रुपये एक लाख ऐक्याऐंशी हजार पाचशे फक्त) इतक्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती विद्यापीठ कर्मचारी कल्याण योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदीमधून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र.१४ **विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना Cashless Group Health Insurance लागू करण्याची बाब विचारार्थ.**

विद्यापीठ कर्मचारी यांच्यासाठी यापूर्वी लागू असलेली "विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती योजना" यामध्ये कॅशलेस सुविधा मिळत नसल्याने सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळाला असून सध्या कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात असल्याने Cashless Group Health Insurance योजना वैद्यकीय विमा पुरवठादार कंपन्यांकडून सुरु करण्यासाठी सर्व सदस्यांमध्ये सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेसाठी यापूर्वी विद्यापीठामार्फत सुरु असलेली "विद्यापीठ कर्मचारी वैद्यकिय खर्च प्रतिपूर्ती योजना" बंद करुन, शासनाकडून कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव संपूष्टात आल्याचे जाहीर होत नाही तोपर्यंत, Cashless Group Health Insurance योजना, वैद्यकीय विमा पुरवठादार कंपन्यांकडून सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र.१५ **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा दोन वर्षाकरीता वार्षिक दरकरार करुन भाडे तत्वावर घेण्याची बाब विचारार्थ.**

विभागास आवश्यक असलेली Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा भाडेतत्वावर घेण्याकरिता तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या दोन निविदाधारकांमधील सर्वात कमी दर असलेले फर्म आणि त्यांनी दिलेला दराचा तपशील विचारात घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **परीक्षा व मूल्यमापन विभागास आवश्यक असलेले Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा घेण्यासाठी तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरलेल्या व सर्वात कमी दर असलेले M/s.ESDS Software Solution Pvt. Ltd., Nashik या फर्मसोबत वार्षिक दरकरार करुन सहा महिन्याकरीता भाडे तत्वावर घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१६ सन २०२०-२१ मध्ये जमा झालेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रकमेचे विनीयोग करण्याची बाब विचारार्थ.**

दि.०७/०१/२०२० रोजीच्या रासेयो सल्लागार समितीच्या बैठकीतील विषय क्र.०७ व दि.३०/०३/२०२१ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीतील ठरावानुसार तसेच महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१९ ऑक्टोंबर, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार, प्रस्तुत विद्यापीठ व रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयामध्ये सन २०२०-२१ मध्ये जमा झालेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रकमेचे विनीयोग करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **सन २०२०-२१ मध्ये जमा झालेल्या आपत्कालीन निधीवरील व्याजाच्या रकमेचे विनीयोग करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र.१७ ज्ञानस्रोत समितीच्या दि. ०८ मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.

दि.०८ मार्च, २०२१ रोजीच्या ज्ञानस्रोत समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांता संदर्भात,

सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : ज्ञानस्रोत समितीच्या दि. ०८ मार्च, २०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.१८ **दि.३०/०३/२०२१ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

दि.३०/०३/२०२१ रोजीच्या खरेदी समिती बैठकीच्या कार्यवृत्तांता संदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **दि.३०/०३/२०२१ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१९ दि.०६/०५/२०21 रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**

दि.०६/०५/२०21 रोजीच्या इमारत व बांधकाम समिती बैठकीच्या इतिवृत्तांता संदर्भात,

सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **दि.०६/०५/२०21 रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.२०** **डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड यांना देण्यात आलेली विद्यापीठ मालकीच्या मौजे कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. ३३१ येथील ५ एकर जमीन परत घेण्याची बाब विचारार्थ.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड यांच्या सोलापूर उपकेंद्रास प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर येथील ४८२ एकर परिसर येथील गट क्र. ३३१ मधील उपलब्ध / हस्तांतरित करुन दिलेल्या ५ एकर जमिनीची प्रस्तुत विद्यापीठास पुन: गरज भासत असल्याने यासंदर्भात बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन सदरचा विषय सामोपचाराने मिटविण्यासाठी, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **सदरचा विषय सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत सादर करावा असे सर्वानुमते ठरले.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| | |
|---|---|
| विषय क्र. २१(१) | व्यवस्थापन परिषदेच्या दि.०३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. १७(३) नुसार Examination Reforms in Current Scenario बाबत गठीत समितीचा अहवालानुसार दि. १९/५/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत संमत झालेल्या ठरावाची बाब विचारार्थ. |

Examination Reforms in Current Scenario बाबत व दि.१९/०५/२०२१ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत संमत झालेल्या ठरावानुसार बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निराकरण करुन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१. **Examination Reforms in Current Scenario** ही प्रस्तुत विद्यापीठाची स्वत:ची परीक्षा प्रणाली असल्याबाबत तत्वत: मान्यता देण्यात आली.
२. या अनुषंगाने याअगोदर सुरु असलेली प्रक्रिया तात्पूरती स्थगित करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. २१(२) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार विविध विषयातील एकूण ८७ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे स्थानिक निवड समितीमार्फत भरणेची बाब विचारार्थ.**

विद्यापीठात दरवर्षी नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित शिल्लक कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत माहे एकत्रित वेतनावर तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरणेसाठी संकुलनिहाय खालीलप्रमाणे ८७ तात्पुरती कंत्राटी शिक्षकांची पदे निश्चित केली असून यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| अ. क्र. | संकुलाचे नाव | संकुलाकडील एकूण कार्यभार | मागणी केलेली शिक्षकांची संख्या | आढाव्याअंती मंजूर करण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|---|
| १) | पदार्थविज्ञान संकुल | २८० | ०९ | ०९ |
| २) | रसायनशास्त्र संकुल | ४६८ | १२ | ०९ |
| ३) | भूशास्त्र संकुल | २८८ | ०९ | ०७ |
| ४) | सामाजिकशास्त्रे संकुल | १४८ | १० | ०९ |
| ५) | संगणकशास्त्र संकुल | ६३२ | १४ | १२ |
| ६) | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | ५३६ | ०८ | ०८ |
| ७) | भाषा व वाङ्मय संकुल | ६४० | १६ | १६ |
| ८) | तंत्रज्ञान संकुल | २०० | १० | ०७ |
| ९) | ललित कला व कला संकुल | ७२ | ०६ | ०६ |
| १०) | जैवशास्त्र संकुल | १२८ | ०४ | ०४ |
| | एकूण | ३३९२ | ९८ | ८७ |

ठराव : **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार विविध विषयातील एकूण ८७ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे स्थानिक निवड समितीमार्फत भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र. २१(३)** **मराठी , ऊर्दु व प्राकृत या विषयाचे सामंजस्य करार (MoU) करण्याची बाब विचारार्थ.**

भाषा व वाङ्मय संकुलातील मराठी विभागाचे दक्षिण महाराष्ट्र सहित्य सभा, कोल्हापूर तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद मनोरमा शाखा, सोलापूर व ऊर्दू विभागाचे खदिमाने ऊर्दू फोरम, सोलापूर आणि प्राकृत विभागाचे आचार्य जंबुसागर ग्रंथमाला, सोलापूर यांच्यासोबत सामंजस्य करार करण्याच्या मसुद्यामध्ये कायदा अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनांचा अंर्तभाव करुन मराठी, ऊर्दु व प्राकृत या विषयाचे सामंजस्य करार (MoU) करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **मराठी, ऊर्दु व प्राकृत या विषयाचे सामंजस्य करार (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

विषय क्र. २१(४) राज्यातील कोविड -१९ ची पार्श्वभूमी लक्षात घेऊन व मा.विभागीय सहसंचालक, (उ. शि.) सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरुन :

अ) प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयाकडून कॅस (CAS) अंतर्गत प्राप्त झालेल्या सहायक प्राध्यापक (स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३) या स्टेज ची स्थाननिश्चिती/पदोन्नती मधील छाननी व त्रुटी पूर्ततेचे कामकाज विद्यापीठ स्तरावर पूर्ण झालेले असून शासन प्रतिनधी यांच्या उपस्थित होणारे उर्वरीत Screening चे काम विद्यापीठ स्तरावर करुन घ्यावे की महाविद्यालय स्तरावर करुन घ्यावे ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ब) सहायक प्राध्यापक ( स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३) या स्टेज ची स्थाननिश्चिती/पदोन्नती मधील उर्वरीत Screening चे काम महाविद्यालय स्तरावरुन करण्याविषयी ठराव झाल्यास शिक्षकांकडून प्रस्तावासोबत घेण्यात आलेल्या रु.३०००/- शुल्कामधील, महाविद्यालयास अदा करावयाच्या शुल्काची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षकांचे सहायक प्राध्यापक (स्टेज १ व स्टेज २) या पदोन्नती/स्थाननिश्चिती मधील छाननी व त्रुटी पूर्ततेचे कामकाज विद्यापीठ स्तरावर पूर्ण झालेले असून शासन प्रतिनधी यांच्या उपस्थित होणारे उर्वरीत Screening च्या कामासाठी कोविड-१९ ची पार्श्वभूमी लक्षात घेऊन व मा.विभागीय सहसंचालक, (उ. शि.) सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रास अनुसरुन सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१. प्रस्तुत विद्यापीठातील संलग्नीत महाविद्यालयाकडून कॅस (CAS) अंतर्गत प्राप्त झालेल्या सहायक प्राध्यापक (स्टेज १ ते २ व स्टेज २ ते ३) या स्टेज ची स्थाननिश्चिती/पदोन्नती मधील छाननी व त्रुटी पूर्ततेचे कामकाज विद्यापीठ स्तरावर पूर्ण झालेले असल्याने शासन प्रतिनिधी यांच्या उपस्थित होणारे उर्वरीत Screening चे काम हे विद्यापीठ स्तरावर केंद्रीय पध्दतीने पूर्ण करुन घेण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांना विनंती करण्यात यावी.
२. मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांनी विनंती अमान्य केल्यास उर्वरीत Screening चे काम संबंधित महाविद्यालय स्तरावरुन करावयाचे झाल्यास शिक्षकांकडून प्रस्तावासोबत घेण्यात आलेल्या रु.३०००/- शुल्कामधील, रु.१,५००/- इतके शुल्क महाविद्यालयास अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र. २१(५) IT Policy व Research Policy बाबत मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : IT Policy व Research Policy बाबत तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र. २१(६) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नविन महाविद्यालय सुरु करण्याकरिता अंतीम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्था कडून प्राप्त पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ अन्वये व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या दि. १५/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच मा.कुलगुरु महोदया यांनी नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार दि.२१/०५/२०२१ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नविन महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्राप्त प्रस्ताव शासनास सादर करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी नविन महाविद्यालय सुरु करण्याकरिता अंतिम इरादापत्र मिळण्यासाठी विविध संस्थाकडून प्राप्त पात्र प्रस्तावांना महाराष्ट्र शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. परंतू, डॉ. पतंगराव कदम बहुउद्देशीय संस्था संचलित दिपक आबा साळुंखे पाटील महाविद्यालय, कोळे, ता. सांगोला यांचेकडून नवीन महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत भाडेतत्वावर इमारत घेऊन कार्यवाही करण्याबाबत हमीपत्र घेण्याच्या अटीवर सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सदस्य सचिव<br>व्यवस्थापन परिषद | अध्यक्ष<br>व्यवस्थापन परिषद |